राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना (राष्ट्रीय पाळणाघर योजना) अंतर्गत १ जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत कार्यरत असलेल्या पाळणाघरांचे अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबाविं-२०१७/प्र.क्र.१५७/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ फेब्रुवारी २०१९

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.२९९/का.०६, दि.१५ एप्रिल, २०१७
(२) महिला व बाल विकास विभाग,पत्र क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.२८७/का.६,दि.२७ जून २०१८
(३) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.३४८/का.०६, दि.३० जून, २०१८
(४) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.३३८/का.०६, दि.७ जानेवारी २०१९
(५) महिला व बाल विकास विभाग,पत्र क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१५७/का.६,दि.१२/२/२०१९

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाकडून राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना राबविण्यात येते. सदर योजनेची अंमलबाजवणी राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड व राष्ट्रीय बाल कल्याण परिषद यांच्या मार्फत राबविण्यात येत होती. केंद्र शासनाने पाळणाघर योजनेसाठी सुधारित मार्गदर्शक तत्वे दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू केली असून राजीव गांधी पाळणाघर योजनेतंर्गत सुरु असलेली पाळणाघरे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत (ICDS) समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर पाळणाघरे (Anganwadi cum creche) महणून कार्यरत रहाणार आहेत.

२. राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजनेअंतर्गत राज्यात एकूण १६७० पाळणाघरे (केंद्र शासनामार्फत अनुदानित-२३३, राज्य समाजकल्याण बोर्डामार्फत-७०६, भारतीय आदिम जाती सेवक संघ नागपूर-४०१,महाराष्ट्र राज्य बालकल्याण परिषद,नाशिक यांचेमार्फत-३३०) अशी सुमारे १६७० पाळणाघरे स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत होती. केंद्र शासनाने सदर योजना समाज कल्याण बोर्डामार्फत न राबविता संबंधित राज्यांच्या महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्याचा निर्णय घेतलेला असून त्याकरीता सध्याच्या अंमलबजावणी यंत्रणांना अनुदान देण्याऐवजी ते थेट त्या-त्या राज्यांना देण्यात येणार आहे. (२५ मुले असलेले एक पाळणाघर १ युनीट धरण्यात येते.) राजीव गांधी पाळणाघर योजनेतंर्गत सुरु असलेल्या पाळणाघरांची आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवायोजना,नवी मुंबई कार्यालयामार्फत तपासणी केल्यानंतर फक्त सुमारे ८०० पाळणाघरे सुरु असल्याचे आढळून आले आहे. केंद्र शासनाने सदर योजना राज्य

शासनाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतलेला आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसार केंद्र हिस्सा ६०%, राज्य हिस्सा ३०% व संस्थेचा हिस्सा १०% असे निधीचे प्रमाण आहे.

३. केंद्र शासनाने १ जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीमधील ३ महिन्याचे संस्थांचे शिल्लक अनुदान हप्ता महिला व बाल विकास विभागामार्फत अदा करण्यासाठी रुपये ४०७.०१ लाख इतके अनुदान राज्य शासनास वितरीत केलेले आहे. सदर निधी राज्याच्या कोषागारात जमा झालेला असल्याचे अर्थोपाय कार्यासनाकडून प्रमाणित करुन घेण्यात आलेले आहे. राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजनेतंर्गत पाळणाघरे राज्य शासनाच्या कोणत्या यंत्रणेमार्फत चालविण्यात यावीत याबाबत निर्णय होईपर्यंत १ एप्रिल २०१७ पासून पाळणाघरांची मान्यता स्थगित ठेवण्याबाबत सर्व संबधित पाळणाघरे चालविणा-या संस्थाना कळविण्याबाबत समाजकल्याण बोर्डाला कळविण्यात आलेले आहे. उर्वरित सर्व पाळणाघर चालविणा-या संस्थाना पाळणाघरांची मान्यता स्थगिती ठेवण्याबाबत सर्व संबधितांना कळविण्याबाबत आयुक्त, ए.बा.वि. सेवायोजना, नवी मुंबई यांना दिनांक २७ जून २०१८ च्या पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक ९ जुलै २०१८ च्या पत्रान्वये सर्व संबधितांना कळविलेले आहे. राज्यात राष्ट्रीय पाळणाघर योजनेतंर्गत चालविण्यात येणारी पाळणाघरे, स्वयंसेवी संस्थांमार्फत खाजगीरित्या चालविण्यात येणारी पाळणाघरे यासाठी कार्यनियमावली /कार्यपध्दती दिनांक ७ जानेवारी २०१९ पासून राज्यात लागु करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने पाळणाघर संस्थांचे उपलब्ध करुन दिलेले दिनांक १ जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीमधील संस्थाचे अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u> केंद्र शासनाने दिनांक १ जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीमधील ३ महिन्याचे संस्थांचे शिल्लक राहिलेले अनुदान महिला व बाल विकास विभागामार्फत अदा करण्यासाठी ६०% रुपये ४०७.०१ लाख वितरीत केलेले आहे. राज्य हिस्सा ३०% रुपये २०३.५० लाख असे **एकुण ६१०.५१ लाख** निधी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांच्यामार्फत तपासणी झालेल्या पाळणाघर संस्थांना वितरीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२ आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांनी समाजकल्याण बोर्डाशी समन्वय ठेऊन दिनांक १ जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीमधील ३ महिन्याचे संस्थांचे अनुदान वितरीत करावे.

३. केंद्र शासनाने सन २०१६-१७ मध्ये रुपये ४०७.०१ लाख इतका निधी उपलब्ध करुन दिलेला असल्यामुळे तो Revalidation करुन मिळण्याबाबत केंद्र शासनास शासनाच्या दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ च्या पत्रान्वये वनंती करण्यात आलेली आहे. त्याचा आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांनी पाठपुरावा करुन निधी Revalidation करुन मिळाल्यानंतर संस्थाना ६०:३० याप्रमाणात निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी व सदर खर्च खालील लेखाशिर्षातंर्गत भागविण्यात यावा.

लेखाशिर्ष	रक्कम **(रुपये लाखात)**
२२३६२१०१ (केंद्र हिस्सा) ६०% ३१-सहायक अनुदान ५०-इतर खर्च	 ०००.०१ ४०७.०० **४०७.०१**
२२३६२११९ (राज्य हिस्सा) ३०% ३१-सहायक अनुदान ५०-इतर खर्च	 ०००.०१ २०३.४९ **२०३.५०**
एकुण रुपये	**६१०.५१**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२७१८०९४१३४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.02.27 18:12:06 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता,विधान सभा,विधानमंडळ, मुंबई/नागपूर
५) मा.विरोधी पक्ष नेता,विधान परिषद,विधानमंडळ,मुंबई/नागपुर
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई
८) अपर मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
९) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१०) प्रधान सचिव (नगर विकास),नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
११) प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य)सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) प्रधान सचिव (कामगार विभाग) उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
१३) प्रधान सचिव (विधी व न्याय), विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई

१४) प्रधान सचिव (वि.सू.),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१५) प्रधान सचिव (आदिवासी विकास),मंत्रालय,मुंबई
१६) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) सचिव (म.व बा.वि.) मंत्रालय,मुंबई
१८) सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) विभाग,मंत्रालय,मुंबई
१९) सचिव (महिला व बाल विकास) मंत्रालय,मुंबई
२०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
२२) उप आयुक्त (सनियंत्रण) एकात्मिक बाल विकास सेवायोजना,नवी मुंबई
२३) सर्व विभागीय आयुक्त
२४) सर्व जिल्हाधिकारी
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२६) सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
२७) संचालक,नगरपालिका प्रशासन,मुंबई
२८) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२९) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
३०) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी)
३१) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
३२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
३३) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन,मुंबई
३४) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, (जिल्हा परिषद)
३५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
३७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३८) सर्व खाजगी संस्थाचालक,पाळणाघरे,महाराष्ट्र राज्य
३९) निवड नस्ती (कार्यासन ६)